**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत वैयक्तिक लाभार्थ्याच्या शेतावर डाळिंब या कोरडवाहू फळपीकाची प्रायोगिक प्रकल्प म्हणून लागवड करणे बाबत.**

महाराष्ट्र शासन
शासन परिपत्रक क्रमांक : मग्रारो-२०१३/प्र.क्र.११८/मग्रारो-१,
नियोजन (रोहयो) विभाग
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : १९ जून, २०१४

**संदर्भ :**

१) नियोजन (रोहयो) विभाग, शासन निर्णय क्रमांक : मग्रारो-२०११/प्र.क्र.५८/रोहयो-१०अ, दिनांक २९ जून, २०११

२) नियोजन (रोहयो) विभाग, शासन निर्णय क्रमांक : मग्रारो-२०११/प्र.क्र.१३२/रोहयो-१०अ, दिनांक २० जानेवारी, २०१२

३) नियोजन (रोहयो) विभाग, शासन निर्णय क्रमांक : मग्रारो-२०१३/प्र.क्र. ११८/मग्रारो-१, दिनांक २० फेब्रुवारी, २०१४

**प्रस्तावना :**

रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून राज्य शासन मागील २५ वर्षापासून फळबाग लागवडीचा कार्यक्रम यशस्वीरित्या राबवित आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमध्ये सन २००९ या वर्षी अनुसूचित जाती/जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक ईत्यादि शेतकऱ्यांसाठी फळबाग लागवड कार्यक्रम समाविष्ट करण्यात आला. त्यासाठी राज्य शासनाने उपरोक्त संदर्भ क्रमांक १ व २ येथील शासन निर्णयान्वये ग्रामपंचायत व कृषि विभागाच्या मार्फत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत फळबाग लागवड योजना राबविण्याच्या आवश्यक मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत.

२. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा प्रमुख उद्देश देशातील ग्रामीण भागात रोजगाराची निर्मिती करून शहरीभागाकडे होणारे स्थलांतर कमी करणे हा आहे. तसेच या योजनेचे दुसरा प्रमुख उद्देश रोजगार निर्मिती द्वारे ग्रामीण भागात विशेषत: शेतीची उत्पादकता वाढवून उपजावू स्वरूपाची मालमत्ता निर्माण करणे हा आहे. या उद्देशाने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत विशिष्ट प्रवर्गासाठी फळबाग लागवड कार्यक्रमाची व्याप्ती वाढविण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे.

३. फळपीक लागवडीचे सद्याचे आर्थिक निकष हे स्थानीक लागवड पद्धतीनूसार करण्यासाठी सुधारित करण्याची मागणी येत आहे जेणेकरून स्थलांतरास प्रतिबंध होवू शकतो. तसेच लाभार्थी शेतकऱ्यांना फळझाडाच्या सुरूवातीच्या तीन वर्षाच्या लागवड कार्यक्रमात प्रत्यक्षात समाविष्ट करून झाडाचे संगोपन व संरक्षण करून जिवंत झाडांची टक्केवारी वृध्दीगंत करण्याची मागणी प्राप्त होत आहे. याप्रमाणे संचालक, फलोत्पादन यांचेकडून शासनास प्रस्ताव प्राप्त झाला होता व त्यावर शासन निर्णय दिनांक २० फेब्रुवारी, २०१४ प्रमाणे निर्णय घेण्यात आला होता. तथापि, सदर कार्यक्रमात फळझाडांच्या संगोपन व संरक्षणावर विशेष भर नसल्यामुळे या योजनेस अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे दिनांक २० फेब्रुवारी, २०१४ च्या शासन निर्णयातील डाळिंब या फळपीकाच्या अंदाजपत्रकात संगोपन व संरक्षण या बाबीवर अधिक भर देण्याची बाब

शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने अवर्षण प्रवण क्षेत्रात डाळिंब या फळपीकासाठी प्रायोगिक तत्वावर फळबाग लागवड कार्यक्रम राबविण्याबाबत शासन खालील निर्णय घेत आहे.

**शासन परिपत्रक :**

विशेषत: अवर्षण प्रवण भागातील कमी पावसाच्या प्रदेशातील कोरडवाहू फळपीकांच्या उत्पादनात वाढ करण्यासाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण योजने अंतर्गत इतर राज्यातील फळबाग लागवड कार्यक्रमाचा अभ्यास करून व प्राप्त प्रस्तावाचे सविस्तर तपासणी करून ५००० हेक्टर क्षेत्रावर डाळिंब या फळपीकाचा संरक्षण व संगोपनाचा लागवड कार्यक्रम एक प्रायोगिक प्रकल्प म्हणून राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. डाळिंब हे फळपीक कोरडवाहू फळपीक असून वर्षभर मागणी असल्यामुळे डाळिंब या फळपीकाचा उपरोक्त प्रायोगिक प्रकल्पात समावेश केला आहे.

२. या प्रायोगिक लागवड पद्धती मध्ये लागवड हंगाम कालावधीत जास्तीचे मणुष्यदिवस हे झाडाच्या संगोपन व संरक्षणासाठी विशेषत्वाने देण्यात आलेले आहेत. लाभार्थ्याला प्रदान करावयाचे मजुरी/ साहित्याची रक्कम ही जीवंत झाडाच्या टक्केवारीनुसार देण्यात येणार आहे. या प्रायोगिक प्रकल्पाचे सविस्तर अंदाजपत्रके सोबत परिशिष्ट १ मध्ये देण्यात आलेले आहेत. त्यानुसार अंदाजपत्रके तयार करावीत.

३. ज्या तालुक्यांमध्ये डाळिंबाची लागवड काही प्रमाणात करण्यात आलेली आहे अशा ७ तालुक्याची निवड सदर प्रायोगिक प्रकल्पात करण्यात आली आहे. याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | क्षेत्र मर्यादा | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | बुलढाणा | चिखली, देऊळगावराजा | १००० हेक्टर | |
| २ | जालना | भोकरदन | ५०० हेक्टर | |
| ३ | बीड | शिरूर, पाटोदा व आष्टी | १५०० हेक्टर | अवर्षण प्रवण स्थलांतरग्रस्त भाग |
| ४ | नागपूर | काटोल | ५०० हेक्टर | |
| ५ | उपरोक्त जिल्हे | उपरोक्त तालुके | १५०० हेक्टर | राखीव क्षेत्र |
| **एकूण क्षेत्र** | | | **५००० हेक्टर** | |

सदर प्रकल्प नवीन स्वरूपाचा असल्यामुळे सद्यस्थितीत लाभार्थ्यांच्या मागणीचा अंदाज घेणे शक्य होणार नाही. त्यामुळे सद्यस्थितीत प्रति तालुका ५०० हेक्टर क्षेत्र मर्यादा निश्चीत करण्यात येत आहे व उर्वरित १५०० हेक्टर क्षेत्र हे वरील तालुक्यांसाठी राखीव राहील. तथापि, उपरोक्त ५०० हेक्टर क्षेत्राची मर्यादा संपल्यानंतर ज्या तालुक्यात माहे ३१ जुलै,२०१४ अखेर जादाची लाभार्थी मागणी असेल त्या तालुक्यासाठी राखीव फळबाग लागवड क्षेत्र घेता येईल. उपरोक्त प्रमाणे राखीव ठेवण्यात आलेले १५०० हेक्टर हे उपरोक्त तालुक्यात वाटप करण्याचे अधिकार आयुक्त (कृषि) यांना प्रदान करण्यात येत आहेत. आयुक्त (कृषि) यांनी याबाबत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व सहसंचालक कृषि यांचे अभिप्राय विचारात घ्यावेत.

४. हा प्रायोगिक प्रकल्प राबवितांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने च्या सर्व मार्गदर्शक तत्वांचे पालन करणे बंधनकारक राहील. कृषि विभाग व संबंधित जिल्हा कार्यक्रम समन्वयक यांनी सदर कार्यक्रमाचे जाणीवपूर्वक संनियंत्रण करावे तसेच जिवंत झाडाच्या टक्केवारीचे वेळोवेळी प्रमाण तपासण्यासाठी विशेष क्षेत्रीय यंत्रणेची नेमणूक करावी. तसेच आवश्यक ते प्रशिक्षण संबंधितांना द्यावे. सदर प्रायोगिक फळबाग लागवड कार्यक्रम हा सन २०१४-१५ या अर्थिक वर्षासाठीच राबविण्यात यावा. या कार्यक्रमास मिळणार प्रतिसाद, महात्मा गांधी नरेगाच्या केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना व इतर बाबी

विचारात घेवून प्रायोगिक प्रकल्प राज्यातील इतर जिल्हयात विस्तारित करण्याचा निर्णय यथावकाश घेण्यात येईल.

५. या प्रायोगिक प्रकल्पामध्ये प्रत्येक जॉबकार्डधारक लाभधारक कुटूंबास किंवा इतर जॉबकार्डधारक कुटूंबास प्रती वर्षी १०० दिवस मनुष्यदिन इतकाच रोजगार देण्यात यावा. याचाच अर्थ एका जॉबकार्डधारक कुटूंबाचे १०० दिवस संपल्यानंतर दुसऱ्या जॉबकार्ड धारक कुटूंबास १०० दिवस रोजगार देण्यात यावा व दुसऱ्या जॉबकार्ड धारक कुटूंबाचे १०० दिवस संपल्यानंतर तिसऱ्या जॉबकार्ड धारक कुटूंबास १०० दिवस रोजगार देण्यात यावा व आवश्कयता भासल्यास चौथ्या कुटूंबास उर्वरित मंजुर मणुष्यदिन इतका रोजगार द्यावा.

६. उपरोक्त प्रायोगिक फळबाग लागवड कार्यक्रमासाठी खालील मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

१. लाभार्थी व इतर मजुर हे जॉबकार्डधारक असावेत.
२. लाभार्थी हा उपरोक्त शासन निर्णयात नमुद केलेल्या अनुज्ञेय प्रवर्गातील असावा.
३. प्रत्येक अठवड्याचे हजेरी पत्रक नियमितपणे ठेवून ते पूर्ण झाल्यावर १५ दिवसांत मजुरी प्रदान करणे आवश्यक राहील.
४. संपुर्ण फळबाग लागवड कार्यक्रमासाठी पुर्व हंगामी मशागत कामे, खड्डे खोदणे, झाडांची लागवड करणे, पाणी देणे, किटकनाशके/औषध फवारणी व झाडांचे संरक्षण करणे ही कामे लाभधारकाने प्रथम: स्वत: करणे आवश्यक आहे. मात्र १०० दिवस झाल्यानंतर इतर जॉबकार्डधारक मजुरांकडून कामे करुन घ्यावीत. अशाप्रकारे नियोजन करण्याची जबाबदारी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणेची राहील.
५. मजुरीची रक्कम फक्त पोस्ट/बँकेमार्फतच दिली जाईल.
६. ग्रामसभा व ग्रामपंचायत यांची मान्यता आवश्यक आहे.
७. आवश्यक प्रमाणपत्रे जसे जातीचा दाखला, दारिद्रय रेषेखालील दाखला, सातबारा इ. प्रमाणपत्रे अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.
८. ग्रामरोजगार नोंदवहीत व ग्राम मालमत्ता नोंदवहीत सर्व प्रकारच्या नोंदी घेणे आवश्यक आहे.
९. MIS वरील सर्व प्रकारच्या नोंदी घेणे.
१०. प्रकल्पस्थळावर फलक लावणे.
११. या प्रायोगिक फळबाग लागवड कार्यक्रमासाठी कृषि विभाग कार्यान्वयीन यंत्रणा राहील. या कार्यक्रमांतर्गत तांत्रिक मान्यता संबंधित तालुका कृषि अधिकारी यांनी द्यावी व प्रशासकीय मान्यता तहसिलदार यांनी द्यावी.
१२. प्रत्येक लाभार्थ्याच्या जमिनीवरील फळबाग लागवड कार्यक्रम हा स्वतंत्र प्रकल्प समजण्यात यावा. अशा प्रत्येक प्रकल्पाला प्रशासकिय व तांत्रिक मान्यता स्वतंत्रपणे देण्यात यावी तसेच प्रत्येक प्रकल्पाला MIS वर नोंद घेण्यासाठी स्वतंत्र संगणक क्रमांक देण्यात यावा.
१३. उपरोक्त कार्यक्रमाचे सामाजिक अंकेक्षण करणे आवश्यक आहे.
१४. रोपांची लागवड झाल्यानंतर जिवंत रोपांची टक्केवारीची तपासणी संबंधित ग्रामसेवक व कृषि सहाय्यक यांनी करावी व प्रथम वर्षी ९० टक्के जीवंत रोपांची टक्केवारी असल्याच व द्वितीय व तृतीय वर्षी ९५ टक्के जीवंत रोपांची टक्केवारी असल्यासच मजुरी व सामुग्रीचा खर्च देण्यात यावा. याचाच अर्थ प्रथम वर्षी जीवंत असलेल्या ९० टक्के झाडाच्या ९५ टक्के झाडे व्दितीय व तृतीय वर्षी जीवंत असावीत.
१५. या कार्यक्रमांतर्गत होणारा साधनसामुग्रीवरील खर्च खालीलप्रमाणे करण्यात यावा.

१) कलमे/रोपे यावर होणारा खर्च (कृषि विभागाने बिल/व्हाऊचर सादर केल्यानंतर) धनादेश/ईएफएमएस द्वारे कृषि विभागास प्रदान करावा.

२) निविष्ठा जसे खत, औषधे व इतर साहित्य यावर होणा-या खर्चाची रक्कम (व्हाऊचर सादर केल्यानंतर) धनादेश/ईएफएमएस द्वारे लाभार्थ्यास अदा करावे.

१६. उपरोक्त संदर्भीय शासन निर्णयात नमूद केलेल्या अंमलबजावणीच्या इतर कार्यपदधतीचे पालन करण्यात यावे.

१७. या प्रायोगिक प्रकल्प राबवितांना काम सुरू होण्यापूर्वीचे फोटो, काम सुरू झाल्यानंतरचे फोटो व वेळोवेळी जीवंत रोपांची टक्केवारी तपासल्यानंतरचे फोटो संकेतस्थळावर अपलोड करावीत.

१८. दर्जेदार रोपांची लागवड करण्यात यावी. या साठी कृषि विभागाने दर्जेदार रोपांची उपलब्धता शासन मान्य रोपवाटिकेतून करण्याची व्यवस्था करावी.

१९. या प्रायोगिक प्रकल्पात प्रति लाभार्थी क्षेत्र मर्यादा ही कमीत कमी ०.५० हेक्टर ते जास्तीत जास्त २ हेक्टर पर्यंत ठेवण्यात यावी.

२०. ईमस्टर प्रणालीचा वापर करणे अनिवार्य आहे.

२१. उपरोक्त कार्यक्रमासाठी तांत्रिक मार्गदर्शन करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व संबंधित तालुका कृषि अधिकारी यांची राहील.

७. या प्रायोगिक कार्यक्रमासाठी आवश्यकतेनूसार तांत्रिक मार्गदर्शक संचालक, फलोत्पादन यांनी वेळोवेळी करावे.

सदर शासन **परिपत्रक** महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. **२०१४०६२०१२४३३८२५१६** असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

वि. गिरीराज

**(वि. गिरीराज)**
**प्रधान सचिव (रोहयो)**

प्रति,

मंत्री (रोहयो) यांचे खाजगी सचिव,
राज्यमंत्री (रोहयो) यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
अतिरिक्त मुख्य सचिव (कृषि) यांचे स्वीय सहाय्यक,
अतिरिक्त मुख्य सचिव (नियोजन) यांचे स्वीय सहाय्यक,
प्रधान सचिव (वित्त) यांचे स्वीय सहाय्यक,
प्रधान सचिव (रोहयो) यांचे स्वीय सहाय्यक,
आयुक्त, महात्मा गांधी नरेगा आयुक्तालय, नागपूर,
विभागीय आयुक्त, अमरावती, नागपूर व औरंगाबाद
आयुक्त (कृषि) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
संचालक, फलोत्पादन, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
विभागीय कृषि सहसंचालक, अमरावती, नागपूर व औरंगाबाद ,
उपायुक्त (रोहयो) अमरावती, नागपूर व औरंगाबाद
जिल्हाधिकारी, नागपूर, बुलढाणा, जालना व बीड
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर, बुलढाणा, जालना व बीड

# परिशिष्ट-१

महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजेनंतर्गतफळबाग लागवड कार्यक्रमाकरीता प्रति हेक्टर खर्चाचे मापदंड

**(मजूरी दर रुपये १६८ प्रमाणे)**

**हेक्टरी झाडे संख्या -४००**

**अंतर-५*५**

**फळपिकाचे नाव- डाळिंब कलमे**

| अ.क्र. | | घटक | पहिले वर्ष | | | | दुसरे वर्ष | | | | तिसरे वर्ष | | | | एकुण | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मजूरी | सामुग्री | एकुण | श्रमिक दिन | मजूरी | सामुग्री | एकुण | श्रमिक दिन | मजूरी | सामुग्री | एकुण | श्रमिक दिन | मजूरी | सामुग्री | एकुण | श्रमिक दिन | |
| अ | | लागवडपूर्व कामे | | | | | | | | | | | | | | | | | |
| | १ | जमिन तयार करणे | ६७२० | ० | ६७२० | ४० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ६७२० | ० | ६७२० | ४० | |
| | २ | खड्डे खोदने | ८४०० | ० | ८४०० | ५० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ८४०० | ० | ८४०० | ५० | |
| | ३ | कुपन करणे | १००८० | ० | १००८० | ६० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १००८० | ० | १००८० | ६० | |
| | | **एकुण अ** | २५२०० | **०** | **२५२००** | **१५०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | २५२०० | **०** | **२५२००** | **१५०** | |
| **ब** | | **लागवड करणे** | | | | | | | | | | | | | ० | | | ० | |
| | १ | माती व खत मिश्रण खड्डे भरणे | ३३६० | ११७०० | १५०६० | २० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ३३६० | ११७०० | १५०६० | २० | |
| | २ | कलमाची लागवड करणे | ३३६० | १२००० | १५३६० | २० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ३३६० | १२००० | १५३६० | २० | |
| | | **एकुण ब** | ६७२० | **२३७००** | **३०४२०** | **४०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | ६७२० | **२३७००** | **३०४२०** | **४०** | |
| | | **एकुण(अ+ब)** | ३१९२० | **२३७००** | **५५६२०** | **१९०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | ३१९२० | **२३७००** | **५४४८०** | **१९०** | |
| **क** | | **परिरक्षण करणे** | ० | | | | | | | | | | | | ० | | | | |
| | १ | नांग्या भरणे | ० | ० | ० | ० | ६७२ | ० | ६७२ | ४ | ० | ० | ० | ० | ६७२ | ० | ६७२ | ४ | |
| | २ | खते देणे | ० | ० | ० | ० | ३३६० | ५४०० | ८७६० | २० | ३३६० | ५४०० | ८७६० | २० | ६७२० | १०८०० | १७५२० | ४० | |
| | ३ | आंतर मशागत | ५०४० | ० | ५०४० | ३० | ५०४० | ० | ५०४० | ३० | ५०४० | ० | ५०४० | ३० | १५१२० | ० | १५१२० | ९० | |
| | ४ | पिकसंरक्षण व संगोपन | १६८० | १५०० | ३१८० | १० | ३६१२० | ३००० | ३९१२० | २१५ | ३६७९२ | ३००० | ३९७९२ | २१९ | ७४५९२ | ७५०० | ८२०९२ | ४४४ | |
| | ५ | पाणी देणे | ६३८४ | ० | ६३८४ | ३८ | ६३८४ | ० | ६३८४ | ३८ | ६३८४ | ० | ६३८४ | ३८ | ११९५२ | ० | ११९५२ | ११४ | |
| | ६ | इतर संकीर्ण | १६८० | ० | १६८० | १० | ८४० | ० | ८४० | ५ | ८४० | ० | ८४० | ५ | ३३६० | ० | ३३६० | २० | |
| | | | ० | | | | ० | | | | ० | | | | ० | | | | |
| | | **एकुण क** | **१४७८४** | **१५००** | **१६२८४** | **८८** | **५२४१६** | **८४००** | **६०८१६** | **३१२** | **५२४१६** | **८४००** | **६०८१६** | **३१२** | **११९६१६** | **१८३००** | **१३७९१६** | **७१२** | |
| | | **एकुण(अ+ब+ क)** | **४६७०४** | **२५२००** | **७१९०४** | **२७८** | **५२४१६** | **८४००** | **६०८१६** | **३१२** | **५२४१६** | **८४००** | **६०८१६** | **३१२** | **१५१५३६** | **४२०००** | **१९३५३६** | **९०२** | |

1 पहिल्या वर्षी डाळिंब पिकाकरीता एकूण २७८ मनुष्य दिवस मजूरी देय असून त्यापैकी १९० मनुष्य दिवस लागवडपूर्व कामे व लागवड करण्याकरीता आहे त्यापैकी १०० मनुष्य दिवस लाभधारक कुटूंबास उर्वरित ९० मनुष्य दिवस दुस-या कुटूंबास तसेच ऑक्टोबर ते मार्च या कालावधीसाठी परिरक्षणाकरीता ८८ मनुष्य दिवस तिस-या कुटूंबास देय राहील.

२. दुस-या वर्षाकरीता ३१२ मनुष्य दिवस मजूरी देय असून त्यामध्ये लाभधारकास १०० दिवस, दुस-या व तिसऱ्या कुटूंबातील व्यक्तीस प्रत्येकी १०० मनुष्य दिवस व उर्वरित चौथ्या कुटूंबास १२ मणुष्य दिन मजूरी देय राहील.

३. तिस-या वर्षाकरीता ३१२ मनुष्य दिवस मजूरी देय असून त्यामध्ये लाभधारकास १०० दिवस, दुस-या व तिसऱ्या कुटूंबातील व्यक्तीस प्रत्येकी १०० मनुष्य दिवस व उर्वरित चौथ्या कुटूंबास १२ मणुष्य दिन मजूरी देय राहील.